**ठळक बातम्या**

- भारत क्षयरोगमुक्त राष्ट्र बनण्यासाठी वेगाने वाटचाल करत असल्याची आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांची लोकसभेत माहिती
- महाराष्ट्र विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी
- जम्मू आणि काश्मीरमध्ये अनंतनाग जिल्ह्यात लागलेल्या आगीमुळे २०पेक्षा जास्त घरांचं नुकसान
- लंडनमध्ये विद्युत उपकेंद्राला लागलेल्या आगीनंतर हीथ्रो विमानतळ आज बंद राहणार, भारतातून जाणारी विमान उड्डाणं रद्द

  **आणि**

- ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीचा स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

भारत येत्या वर्षात क्षयरोगमुक्त राष्ट्र बनण्यासाठी वेगाने वाटचाल करत आहे. देशात क्षयरोगाच्या प्रादुर्भावाचा दर २०१५ मध्ये प्रति लाख लोकसंख्येमागे २३७ होता, तो २०२३ मध्ये प्रति लाख लोकसंख्येमागे १९५ पर्यंत १७.७ टक्क्यांनी कमी झाला आहे, असं आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी म्हटलं आहे. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना आज त्या बोलत होत्या. क्षयरोगाच्या रुग्णांना शोधण्यासाठी सरकारने ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ३४७ जिल्ह्यांमध्ये १०० दिवसांची क्षयरोग निर्मूलन मोहीम सुरू केली आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचा मुद्दा आज राज्यसभेतही गाजला. काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनी शून्य प्रहरात हा मुद्दा उपस्थित केला. सभापती जगदीप धनखड यांनी या प्रकरणाची दखल घेतली असून या अधिवेशनातच सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेते यांच्याशी या मुद्द्यावर चर्चा केली जाईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. या समितीत आणखी तज्ज्ञांचा समावेश केला जाईल, आणि समितीनं दिलेल्या अहवालानुसार विधीमंडळात विधेयक मांडलं जाईल असं त्यांनी सांगितलं. विधानसभेच्या आज झालेल्या विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना चर्चेला घेतल्या गेल्या, त्यात यासंबंधीची सूचना गोपीचंद पडळकर यांनी उपस्थित केली होती. चंद्रपूर जिल्ह्यात जिवती तालुक्यातल्या वन जमिनी शेतकऱ्यांना देता याव्यात, यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू, वन विभागाला अन्य जमिनी देऊन या जमिनी सोडवून घेऊ असं आश्वासनही त्यांनी दिलं.

राज्यातल्या अपूर्ण राहिलेल्या धरणांची कामं पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवला जाईल असं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, उत्तम जानकर यांनी मांडलेल्या लक्षवेधीला उत्तर देतांना सांगितलं.

<><><><><>

मुंबईतल्या काँक्रीटच्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट असल्याच्या मुद्यावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सोमवारी बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. यावेळी राहुल नार्वेकर यांनी त्यांच्या स्वतःच्या मतदारसंघातली कामं रखडल्याचं नमूद करत, खड्डेमुक्त मुंबई या संकल्पनेला गालबोट लागल्याची प्रतिक्रियाही व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचं आश्वासनही प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी केली. याबाबत विधासभेचे सदस्य अतुल भातखळकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. मुंबईत सध्या चालू असलेली रस्त्यांची कामं रखडलेली असून, संपूर्ण शहर खोदून ठेवलं असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला होता. याबाबत पराग अळवणी, अमित साटम, योगेश सागर, आदित्य ठाकरे, अमित देशमुख, वरुण सरदेसाई या सदस्यांनीही नाराजी व्यक्त केली.

मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारलेल्या होर्डिंग्जच्या प्रकरणातही कठोर कारवाई करत, जबाबदार कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचं आश्वासनही मंत्री उदय सामंत यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना दिलं.

दरम्यान आज प्रश्नोत्तराला सुरुवात झाली तेव्हा उत्तरं देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात उपस्थित नव्हते, त्याबद्दल दोन्ही बाजूच्या सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली, त्यावर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं, त्यानंतर कामकाज पुन्हा सुरू झालं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. चंद्रकांत रघुवंशी, दादाराव केचे, संजय केणेकर, संजय खोडके, संदीप जोशी यांना

सभापती राम शिंदे यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला.

**<><><><><>**

दाओसमध्ये झालेल्या करारांमुळे राज्यात १६ लाख रोजगार निर्मिती होणार असून, त्यादृष्टीनं राज्य सरकार या करारांची चोख अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या करारांच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांनी केलेले आरोप त्यांनी फेटाळून लावले, त्याउलट महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या करारांची अंमलबजावणी झालेली नाही असं ते म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे हे माहीत असूनही विरोधक निवडणुका होत नसल्याबद्दल सरकारला दोष देऊन दिशाभूल करत आहेत अशी टीकाही त्यांनी केली.

राज्यात ग्रामीण भागात स्टार्ट अपला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी नेक्स्ट डोअर स्टार्ट अप योजना सुरू केली जाणार आहे, याअंतर्गत १ लाख नवे स्टार्ट अप सुरू करण्याचं उद्दिष्ट समोर ठेवलं असल्याचं कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितलं. रायगड जिल्ह्यात महाड इथं बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा भवन सुरू करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

सरकारच्या घरकुल योजनांतर्गत कोणीही लाभार्थी घरापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वेक्षण करण्याची घोषणा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत केली. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी गायरान, गावठाण जमिनी देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा जागा उपलब्ध नसतील तर

लाभार्थ्याला जागा खरेदीसाठी एक लाख रुपये दिले जातील अशी माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये अनंतनाग जिल्ह्यात काल रात्री लागलेल्या भीषण आगीत २० पेक्षा जास्त घरांचं नुकसान झालं असून ३७ कुटुंबे बेघर झाली आहेत. दक्षिण काश्मीरमधल्या कादिपोरा भागातल्या गाजीनाग इथं एका घरात आग लागली आणि ती आजूबाजूच्या घरांमध्ये पसरली. दाट लोकवस्ती असलेल्या भागात आगीदरम्यान काही गॅस सिलिंडरचे स्फोट झाले. त्यामुळे आग आणखी वेगाने पसरली. पोलीस, सुरक्षा दलं आणि स्थानिकांच्या मदतीने या परिसरातल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं आहे.

<><><><><>

लंडनमध्ये एका विद्युत उपकेंद्राला आग लागली असून त्यातून दीडशे जणांना वाचवण्यात यश आलं आहे. पश्चिम लंडन भागातल्या या उपकेंद्राला काल रात्री आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० गाड्या आणि ७० कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आग लागण्याचं कारण अद्याप कळू शकलेलं नाही. मात्र, त्यामुळे लंडनच्या पश्चिम भागातल्या सुमारे १६ हजार ३०० घरांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. लंडनच्या हीथ्रो विमानतळाचा वीजपुरवठाही खंडित झाला असून आज दिवसभरात विमानतळ बंद राहील अशी माहिती विमानतळाने अधिकृत निवेदनाद्वारे दिली आहे.

या आगीमुळे हीथ्रोकडे येणाऱ्या आणि येणाऱ्या किमान १ हजार ३५१ विमान उड्डाणांवर परिणाम झाला आहे. मुंबई विमानतळाहून हीथ्रोला जाणारं एक विमान पुन्हा मुंबईच्या दिशेने वळवण्यात आलं असून दिल्ली विमानतळाहून निघालेलं

विमान फ्रँकफर्टच्या दिशेने वळवण्यात आलं असल्याची माहिती, एअर इंडिया या विमान कंपनीने दिली आहे. मात्र, उर्वरित सर्व उड्डाणं रद्द करण्यात आली असून प्रवाशांनी अधिक माहितीसाठी संबंधित विमान कंपन्यांशी संपर्क साधावा असं आवाहन विमानतळ प्राधिकरणानं केलं आहे.

**<><><><>**

ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारताच्या मानांकित महिला बॅडमिंटनपटू जोडीनं स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी जर्मनीच्या एमिली लेहमन आणि सेलीन हब्शचा २१-१२, २१-८ असा पराभव केला. उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी त्यांचा सामना हाँगकाँग-चीनच्या येउंग नगा टिंग आणि येउंग पुई लाम या जोडीविरुद्ध होणार आहे.

**<><><><>**

११ व्या आशियाई जलतरण स्पर्धेचे यजमानपद भारताकडे असणार आहे. अहमदाबादमधे नारनपुरा क्रीडा संकुलात १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत पोहणे, डायव्हिंग, आणि वॉटर पोलो यासारख्या विविध जलतरण स्पर्धांचा समावेश असेल.

**<><><><>**

मुंबईत झालेल्या सव्वीस अकराच्या दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा यानं आपलं अमेरिकेतून भारतात प्रत्यार्पण न करण्याविषयी केलेल्या अर्जावर अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात पुढच्या महिन्यात सुनावणी होणार आहे. याआधीही राणा यानं न्यायमूर्ती एलेना कागन यांच्याकडे यासंदर्भातला अर्ज केला होता, पण तो फेटाळला होता. त्यानंतर राणा यानं आता पुन्हा एकदा थेट सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांच्याकडे अर्ज केला आहे.

राणा याचा हा नवा अर्ज ४ एप्रिल २०२५ रोजी न्यायाधीशांच्या बैठकीत चर्चेसाठी ठेवला जाणार असल्याची माहिती अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर दिली गेली आहे.

तहव्वूर राणा हा २६/११ च्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार डेव्हिड हेडलीचा साथीदार असून तो सध्या अमेरिकेत लॉस एंजेलिस इथल्या तुरुंगात कैदेत आहे.

<><><><><>

इस्त्रायलनं गाझामध्ये पुन्हा लष्करी कारवाया सुरू केल्यानंतर हमासने प्रथमच प्रत्युत्तरादाखल तेल अविववर रॉकेट हल्ले केले आहेत. त्यापैकी एक रॉकेट निकामी करण्यात आलं असून इतर दोन रॉकेट निर्जन क्षेत्रात पडल्याचं इस्त्रायलच्या संरक्षण दलानं सांगितलं. दरम्यान, गाझामध्ये हमास संचालित आरोग्य मंत्रालयानं सांगितलं की, इस्त्रायल मध्यरात्रीपासून करत असलेल्या हवाई हल्ल्यात किमान ८५ जणांचा मृत्यू झाला असून मंगळवार पासून आतपर्यंत ५०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून १३३ जण जखमी झाले आहेत. हमासने अजूनही ५९ जणांना ओलिस ठेवले असून त्यापैकी २४ जण जिवंत असल्याचा दावा इस्त्रायल सरकारने केला आहे.